**MHAH080010162024**

-

<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४६१/२०२४ मधील नि. ३४ वरील आदेश</u>

वादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज उशिरा माफ होवून प्रतिदाव्यात “कैफियत नाही” झालेला आदेश रद्द होवून त्याची कैफियत दाखल करुन घेण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. मुळ वादीच्या कथनानुसार, वादी महत्वाच्या कामानिमित्त बाहेरगावी गेला होता. तसेच, वादीस न्यायालयीन कामकाजाची फारशी माहिती नाही. तसेच, वादीला काऊंटर क्लेमवर कैफियत देण्याकामी महत्वाची माहिती व कागदपत्रे वेळेत उपलब्ध झाली नाहीत. मुळ वादीने प्रतिदाव्यावर कैफियत देण्यास हेतुपुरस्सर व जाणीवपुर्वक कोणतीही टाळाटाळ केलेली नसून, प्रतिदाव्यावर कैफियत देणे मुळ वादीच्या दृष्टीने गरजेचे आहे. सबब, उशिरा माफ होऊन “कैफियत नाही” पारीत झालेला आदेश रद्द होवून त्यांचे म्हणणे स्वीकारण्याची विनंती वादीने केलेली आहे.

०३. सदर अर्जाच्या पाठीमागे प्रतिवादी क्र. २ ते ६ यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतलेली आहे. सदर अर्ज खोटा व बनावट असून, तो प्रतिवादी क्र. २ ते ६ यांना मान्य नाही. मुळ वादीला ९० दिवसांचा वेळ मिळूनही त्यांनी जानुनबजुन दाव्याचे कामकाज लांबविण्याचे हेतुन प्रतिवादींना न्यायापासून वंचित ठेवुन म्हणणे देण्यास उशिर केलेला आहे. म्हणून सदर मुळ वादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा. यदाकदाचित न्यायालयाचे मत झाल्यास मुळ वादीविरूध्द जास्तीत–जास्त दंड देण्याचा हुकूम करावा, अशी विनंती केलेली आहे.

०४. वादी व प्रतिवादी तर्फे विधीज्ञांनी प्रस्तुत अर्जावर युक्तीवाद केला.

**०५.** वादीच्या / प्रतिदाव्यातील प्रतिवादीच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मुळ वादी यांना प्रतिदाव्यावर कैफियत देण्याकामी पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. म्हणून मुळ वादीला प्रतिदाव्यास कैफियत दाखल करणेस विलंब झालेला आहे.

**०६.** प्रतिदाव्यातील मुळ वादीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला असता, त्यांनी जाणूनबुजुन उशीर केला असे वाटत नाही. त्यांनी सांगितलेले कारण संयुक्तिक वाटते. उभय पक्षांना आपली बाजू मांडण्याची व त्या अनुषंगाने पुरावा देण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायाचे दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणे योग्य व न्यायोचित आहे. तसेच अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु प्रतिदाव्यातील मुळ वादीच्या दिरंगाईमुळे प्रतिवादीस झालेला त्रास लक्षात घेता सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणे योग्य होईल. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज निशाणी ३४ रक्कम रुपये २००/– (अक्षरी रक्कम रुपये दोनशे फक्त) खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिदाव्यातील वादी यांनी प्रतिवादीस खर्च रुपये २००/– दिल्यानंतर प्रतिदाव्यातील वादीला प्रतिदाव्यास कैफियत अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

USHA DEVIDAS JADHAV

Digitally signed by USHA DEVIDAS JADHAV
DN: cn=USHA DEVIDAS JADHAV, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950338, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.02.01 16:57:40 +0530

दिनांक – ०१/०२/२०२५

(श्रीमती यु.डी.जाधव)
३रे सह दिवाणी न्यायाधीश , क.स्तर,
**संगमनेर**